अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या
मान्यतेनुसार राज्यातील खाजगी संस्थांना
नवीन औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय सुरु
करण्यासाठी परवानगी देण्याबाबत....

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्रशिक्षण विभाग
शासन निर्णय क्र. पीईसी २००६/(२८९/०६)/तांशि-१,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२
दिनांक : १४ जून, २००६

संदर्भ :- अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिरषद, नवी दिल्ली यांचे
दि. ३०.[illegible] ची पत्रे

<u>शासन निर्णय</u> :- अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने त्यांच्या संदर्भाधिन पत्रान्वये सन २००६-०७ या शैक्षणिक वर्षासाठी खालील ९ संस्थांना नवीन औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय सुरु करण्यासाठी परवानगी दिली आहे. त्यास अनुसरुन याबाबतचे शासन आदेश निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

| अ.क्र. | संस्थेचे नांव | अभ्यासक्रम | मान्य प्रवेशक्षमता |
|---|---|---|---|
| १. | कोकण ज्ञानपीठाचे राहल धारकर कॉलेज ऑफ फार्मसी ॲण्ड रिसर्च इन्स्टि, वेनगांव रोड, दहिवली, ता.कर्जत, जि.रायगड ४१०२०१ | बी.फार्मसी | ६० |
| २. | विशाल जुन्नर सेवा मंडळ मुंबई यांचे विशाल इन्स्टि.ऑफ फार्मासिटीकल एज्यु.ॲण्ड रिसर्च, आळे, मु.पो.आळे जुन्नर, पुणे ४१२ ४११ | बी.फार्मसी | ६० |
| ३. | किसान विद्या प्रसारक संस्था, शिरपूर चे के.व्ही.पी.एस. इन्स्टि.ऑफ फार्मास्यूटीकल एज्युकेशन , बोराडी, मु.पो.बोराडी, ता.शिरपूर.जि.धुळे ४२५४२८ | बी.फार्मसी | ६० |
| ४. | चाणक्य एज्युकेशन सोसायटी, पुणे यांचे इंदीरा कॉलेज ऑफ फार्मसी ८९/२अ, नविन मुंबई- पुणे हायवे, वाकडे पोलीस चौकी जवळ, ताथवडे, पुणे | बी.फार्मसी | ६० |

| | | | |
|---|---|---|---|
| ५. | अलार्ड चॅरिटेबल ट्रस्ट पुणे यांचे अलार्ड कॉलेज ऑफ फार्मसी, सेक्टर नं. ५०, राजीव गांधी इंन्फोटेक पार्क जवळ,मारुंजे, ता.मुळशी, जि.पुणे ४११०२७ | बी.फार्मसी | ६० |
| ६. | अंबा दुर्गा एज्युकेशन सोसायटी, नागपूर यांचे दादासाहेब बाळ्पांडे कॉलेज ऑफ फार्मसी स्वामी समर्थधाम मंदीर जवळ, पो.पिपळा हुडकेश्वर, जि.नागपूर ४१२४११ | बी.फार्मसी | ६० |
| ७. | बाळासाहेब माने शिक्षण प्रसारक मंडळ, आंबप, ता.हातकंणगले, जि.कोल्हापूर यांचे कॉलेज ऑफ फार्मसी, मु.पो.पेठ वडगांव, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर ४१६११२ | बी.फार्मसी | ६० |
| ८. | श्री.विठ्ठल एज्युकेशन अ‍ॅण्ड रिसर्च इन्स्टि., गोपाळपूर, ता.पंढरपूर, जि.सोलापूर यांचे कॉलेज ऑफ फार्मसी, पो.बॉ.नं.५४, गोपाळपूर, ता.पंढरपूर ४१३३०४ | बी.फार्मसी | ६० |
| ९. | जयवंत शिक्षण प्रसारक मंडळ, ताथवडे, पुणे यांचे राजश्री शाहू कॉलेज ऑफ फार्मसी अ‍ॅण्ड रिसर्च, सेक्टर नं.८२/ २, पुणे मुंबई बायपास हायवे, ताथवडे, पुणे ४११०३३ | बी.फार्मसी | ६० |

२. अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेची सदरहू वरीलप्रमाणेची मान्यता विचारात घेऊन शासनाकडून या शासन निर्णयान्वये वरील ९ खाजगी संस्थांना सन २००६-०७ करिता कायम विनाअनुदान तत्वावर वरीलप्रमाणे नवीन औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय सुरु करण्यासाठी परवानगी देण्यात येत आहे.

३. सदर मान्यता ही खालील अटी व शर्तीवर देण्यात येत आहे.

१) प्रस्तुत बाबतीत अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने विहित केलेल्या तसेच दि. २१ मे, १९८३ च्या शासन निर्णयान्वये विहित केलेल्या अटीची पूर्तता करणे संबंधित संस्थेस बंधनकारक राहील.

२) शासनाने विहित केलेल्या तसेच अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने विहित केलेल्या सर्व अटी व शर्ती मान्य असल्याबाबत संस्थेस करारनामा करावा लागेल. तसेच संबंधित कागदपत्रांची आणि औपचारिक बाबींची पूर्तता तंत्रशिक्षण संचालकाच्या संमतीने समाधानकारकरित्या करण्यात येईल.

३) सदर अभ्यासक्रमासाठीच्या संलग्नीकरणासाठी संबंधित संस्थेने महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ मधील तरतूदीनुसार संबंधित विद्यापीठाची मान्यता / संलग्नीकरण घेणे आवश्यक आहे.
४) संबंधित संस्थेने संचालक, तंत्रशिक्षण यांचेकडे आवश्यक ती संचीत ठेव संयुक्त खात्यात भरुन इतर कायदेशीर बाबींची पूर्तता करावी.
५) औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालयाने / संस्थेने त्यांच्या संस्थेतील विद्यार्थ्यांचे अंतिम वर्ष पूर्ण होण्यापूर्वी फार्मसी ॲक्ट १९४८ च्या कलम १२ मधील तरतूदीनुसार फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांची विहित मान्यता प्राप्त करुन घेणे बंधनकारक राहिल.
६) सदर पदवी अभ्यासक्रमांचे प्रवेश शासनाने मान्य केलेल्या संबंधित अभ्यासक्रमाच्या प्रवेश नियमानुसार / पध्दतीनुसार करण्यात येतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

( स्मिता द. निवतकर )
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,
१) संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्यं, मुंबई
२) मा. कुलसचिव, मुंबई विद्यापीठ, मुंबई.
३) मा. कुलसचिव,पुणे विद्यापीठ, ,पुणे.
४) मा. कुलसचिव उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव.
५) मा. कुलसचिव,राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर.
६) मा. कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
७) मा. कुलसचिव,सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
८) मा. मंत्री, उच्च व तंत्रशिक्षण यांचे खाजगी सचिव
९) मा. राज्यमंत्री, उच्च व तंत्रशिक्षण यांचे खाजगी सचिव
१०) संबंधित संस्था (संचालक,तंत्र शिक्षण यांचेमार्फत)
११) निवड नस्ती (तांशि-१)

प्रत –
१) सल्लागार (यू.जी.) अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, इंदिरा गांधी खेल परिसर, इंद्रप्रस्थ इस्टेट, नवी दिल्ली ११० ००२.
२) विभागीय अधिकारी, पश्चिम विभागीय कार्यालय, इंडस्ट्रीयल इनशुरन्स बिल्डींग, दुसरा मजला, वीर नरिमन रोड, चर्चगेट, मुंबई ४०० ०२०.